महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (मुख्य इमारत), मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ३६९६
ई-मेल: gnp.housing@maharashtra.gov.in

---

क्र:-बैठक-२०२१/प्र.क्र.९५/गृनिप दिनांक :-०९ मार्च, २०२१

प्रति,

| | |
|---|---|
| १) अपर मुख्य सचिव (गृह ),<br>गृह विभाग,मंत्रालय, मुंबई-४०० ३२ | २) अपर मुख्य सचिव( महसूल),<br>महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई |
| ३) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,<br>गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई-५१ | ४) मुख्य अधिकारी,<br>मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,<br>गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई-०५१ |

विषय :- बी.डी.डी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सोमवार, दि.०८/०३/२०२१ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता, वर्षा निवासस्थान , मलबार हिल, मुंबई येथे उच्च स्तरीय समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली होती. सदरहू बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. सबब, सदरहू इतिवृत्ताच्या अनुषंगाने उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी , ही विनंती.

आपला,

सोबत: वरीलप्रमाणे

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित-

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री(गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
३) मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव,मंत्रालय, मुंबई
४) प्रधान सचिव(गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक,गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई

ना. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली बी.डी.डी. चाळी पुनर्विकास प्रकल्पाच्या उच्च स्तरीय समितीच्या दि. ०८.०३.२०२१ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

शासनाच्या दि. २९.१२.२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये बी.डी.डी. चाळीच्या पुनर्विकास प्रकल्पाच्या अनुषंगाने काही मुद्दयांबाबत अभ्यास करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी गठीत केलेल्या उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या समितीने दि. १५.०२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये शासनास अहवाल सादर केला होता. सदर अहवालाच्या अनुषंगाने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील शक्तीप्रदत्त समितीने दि. २५.०२.२०२१ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानंतर सदर मुद्दयांवर निर्णय घेण्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०८.०३.२०२१ रोजी संध्याकाळी ०६.०० वाजता मा. मुख्यमंत्री महोदयांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी उच्चस्तरीय समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती :-

१) मा. श्री. जितेंद्र आव्हाड, मा. मंत्री, गृहनिर्माण, सहअध्यक्ष, उच्च स्तरीय समिती,
२) मा. श्री. आदित्य ठाकरे, मा. मंत्री, पर्यटन, पर्यावरण व राजशिष्टाचार.
३) मा. श्री. सिताराम कुंटे, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
४) श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास, प्रधान सचिव (गृहनिर्माण), सदस्य सचिव, उच्च स्तरीय समिती.
५) श्री. अनिल डिग्गीकर, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा.

सदर बैठकीमध्ये उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांच्या समितीच्या अहवालातील शिफारशी तसेच त्या अनुषंगाने मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने बैठकीमध्ये घेतलेले निर्णय अवलोकनार्थ सादर करण्यात आले व सदर शिफारशी / निर्णयांवर सविस्तर चर्चा होऊन मा. मुख्यमंत्री महोदयांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले :-

| अ.क्र. | मुद्दा | निर्देश | अंमलबजावणी करणारा विभाग / कार्यालय |
|---|---|---|---|
| १. | वरळी येथील बी.डी.डी. प्रकल्पामध्ये थेट पुनर्वसन इमारतींचे बांधकाम करणे. | यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने घेतलेला निर्णय कायम करण्यात आला. सदर निर्णयानुसार म्हाडाने पुढील कार्यवाही करावी. | म्हाडा |
| २. | बी.डी.डी. प्रकल्पामध्ये पुनर्वसन इमारत तसेच वाहनतळ यांच्याकरीता स्वतंत्र | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | इमारती बांधणे. | | |
| ३. | भाडेदारीच्या अनधिकृत हस्तांतरणाच्या प्रकरणांमध्ये दि. २८.०६.२०१७ हा पात्रतेचा दिनांक आहे. सदर पात्रता दि. ०१.०१.२०२१ असा करणे. | यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने घेतलेला निर्णय कायम करण्यात आला. सदर निर्णयानुसार गृहनिर्माण विभागाने आवश्यक शासन निर्णय तात्काळ निर्गमित करावा. | गृहनिर्माण विभाग |
| ४. | संचालक, बी.डी.डी. चाळी आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांची पात्रता निश्चितीसाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी. | यासंदर्भात मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील शक्ती प्रदत्त समितीने घेतलेला निर्णय कायम करण्यात आला. सदर निर्णयानुसार म्हाडा / गृहनिर्माण विभागाने आवश्यक कार्यवाही करावी. | म्हाडा / गृहनिर्माण विभाग |
| ५. | प्रकल्पातील सेवा सदनिकांमध्ये राहणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना संक्रमण गाळ्यांमध्ये स्थलांतरीत करण्यास गृह विभागाने दिलेली स्थगिती उठविण्याबाबत निर्णय घेणे. | या अनुषंगाने गृह विभागाने तात्काळ कार्यवाही करावी. | गृह विभाग |
| ६. | बी.डी.डी. चाळीतील अनिवासी भाडेकरुंकरीता आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम वाढवून देण्याबाबत. | अनिवासी भाडेकरुंना आर्थिक नुकसान भरपाईची रक्कम रु. २५,०००/- प्रति माह इतकी देण्यात यावी. | म्हाडा |
| ७. | सदर प्रकल्पाकरीता मुद्रांक शुल्क नाममात्र दराने आकारणी करण्याबाबत. | या संदर्भात गृहनिर्माण विभागाने महसूल विभागाकडे यापूर्वीच सादर केलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा. महसूल तातडीने निर्णय घ्यावा. | गृहनिर्माण विभाग / महसूल विभाग |

उपरोक्त निर्देश दिल्यानंतर मा. मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

*************